Vol 6 Issue 3 Sept 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor :4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 3 | September - 2016

GRT Golden Research Thoughts

# बुलंद पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर

*प्रा. सुहास मुरलीधर उघडे*
*वसुंधरा कला महाविद्यालय, जुळे सोलापूर.*

## प्रस्तावना

वृत्तपत्र ही जनसामान्यांच्या मनाची जडणघडण करीत असतात. या देशात इंग्रजांच्या आगमनामुळे ज्या सुधारणा झाल्या. त्यामध्ये छापखाना (मुद्रण कलेचा शोध) या यंत्राने मोलाची भूमिका बजावली. वृत्तपत्र हे प्रसार माध्यम आहे. लोकशाहीचा तो आधारस्तंभ आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनता आपले दुःख व्यथा त्यामध्ये मांडू शकते किंवा वृत्तपत्र समाजातील अनागोंदीच्या कारभारावर कडक ताशेरे ओढण्याचे काम निष्ठेने पार पाडीत असते अशा दुहेरी स्वरुपाचे काम वृत्तापत्रांना करावे लागते याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती. विषमतावादी समाजव्यवस्थेवर कठोर प्रहार करण्यासाठी आणि त्याचवेळी बहुजन समाजात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करण्यासाठी १९२० साली 'मूकनायक' या वृत्तपत्राची सुरुवात डॉ. बाबासाहेबांनी केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले लक्ष पत्रकारीतेवर का केंद्रीत केले असावे? अथवा त्यांना कोणत्या स्वरुपाची पत्रकारीता अभिप्रेत होती याचा बारकाईने शोध घेतला तर 'समूहाकडून समाजाकडे वाटचाल' करणा-या विचारसरणीचे प्रतिबिंब त्याचा पत्रकारीतेमध्ये स्पष्टपणे दिसून येते. त्याचप्रमाणे विषमतावादी व्यवस्थेमधून बहिष्कृत वर्गाला त्याच्या न्यायिक हक्काची जाणिव करुन देऊन. त्याच्या सामाजिक उन्नतीचा मार्ग सोपा व्हावा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मूकनायक' या अर्थपूर्ण शीर्षकाच्याद्वारे पत्रकारीतेला सुरुवात केली. थोडक्यात समाजव्यवस्था परिवर्तनवादी सिध्दांताची मांडणी डॉ. बाबासाहेबांनी केल्याचे दिसून येते.

डॉ. बाबासाहेबांची पत्रकारीतेबद्दलची भूमिका स्पष्ट होती. 'मूकनायक' च्या पहिल्या अंकात ते म्हणतात, "आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणा-या अन्यायावर उपाययोजना सुचविल्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या ख-या स्वरुपाची चर्चा होण्यास वृत्तपत्रासारखी अन्य भूमीच नाही." थोडक्यात अस्पृश्य व बहुजनांना हक्कांची व कर्तव्याची जाणीवजागृती करुन संघर्षाभिमुख करण्यासाठी वृत्तपत्र हे प्रभावी साधन वाटले. राजकीय घडामोडी व सुधारणाबद्दलची भूमिका 'केसरी' ने प्रभावीपणे मांडून एक युग सुरु केले तर 'मूकनायक' ने सामाजिक अन्यायाचा जोरदार प्रतिकार करुन दुस-या युगाचा प्रारंभ केला असे म्हणावे वाटते. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेबांच्या पत्रकारीतेमध्ये पुढील मूल्ये प्रकर्षाने आढळून येतात.



- ***समाजमूल्ये :***

न्याय समाजाची उभारणी करण्यासाठी सदृसदविवेक जागृत असलेल्या नवविचार जोपासणा-या समूहाची निर्मिती व्हावी हे डॉ. बाबासाहेबांना अपेक्षित असावे. त्यामुळे समूहाऐवजी एक संघ समाज स्थापन करण्याचा विचार त्यांनी लोकशाही मूल्यांच्या अधिन राहून मांडला. स्वातंत्र्य, समता, बंधुताव न्याय या मूल्यांचा विचार डॉ. बाबासाहेबांनी पत्रकारीतेच्या केंद्रस्थानी ठेवला होता. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी वार्तामूल्यांची रचना करुन सर्व पैलूंना वैज्ञानिक अंगाने स्पर्श करणे हे पत्रकारीतेचे कर्तव्य आहे. असे डॉ. बाबासाहेबांचे ठाम मत होते.

समाजामध्ये समता प्रस्थापित करावयाची असेल तर प्रथम जाती नष्ट केल्या पाहिजेत. त्याकरीता सहभोजने अथवा मिश्र विवाहांनी जाती नष्ट होणे शक्य नाही. ते म्हणतात 'जात ही वस्तु नसून मनःस्थिती आहे. जात नष्ट करणे म्हणजे दुष्ट मनःस्थिती बदलणे. हिंदू लोक वाईट नाहीत, हिंदू धर्म वाईट आहे. हिंदू धर्माने त्यांच्यात 'जातीचे' दुष्टपण पेरलेले आहे. धर्माने सांगितल्यामुळे जाती पाळल्या जातात. म्हणून जाती नष्ट करायच्या असतील, तर जातींचा धर्म शिकविणा-या हिंदू धर्मशास्त्राविरुध्द लढावे लागणार आहे. ही धर्मशास्त्र म्हणजे तरी काय? हे स्पष्ट करताना डॉ. बाबासाहेब म्हणतात, 'धर्मशास्त्रे म्हणजे काही ऋषींचे आदेश. या ऋषीची स्फूर्ती दैवी मानली गेली. त्यांच्या अंगी अदभूत शक्ती होती. त्यांच्या आज्ञा न पाळल्यास 'पाप' घडते असा समज करुन देण्यात आला होता. जातीचा पाया दैवी असल्याने तो पवित्र आहे. असेही मानण्यात आले आहे. थोडक्यात जाती नष्ट करावयाच्या असतील तर वेद व शास्त्रे यांचा अधिकार नष्ट करावा लागेल.

एकंदरीत डॉ. बाबासाहेबांनी राजर्षी शाहू महाराजांच्या मदतीने 'मूकनायक' पत्र सुरु केले. अस्पृश्य समाज बांधवाची बाजू जनतेसमोर मांडावी. अस्पृश्यांचे नेतृत्त्व स्पृश्यामधून न उभारता ते अस्पृश्यांमधून उभे राहावे, त्यासाठी आवश्यक प्रबोधन केलं जावे हा उद्देश 'मूकनायक' हे वृत्तपत्र सुरु करण्यामागे होता. सिडनहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी करीत असताना सर्वंकष विचार करुन बहिष्कृतांच्या सर्वांगीण विकासासाठी डॉ. बाबासाहेबांनी राजकीय चळवळीचा मार्ग अनुसरला.

'मूकनायक' चा प्रथम अंक ३१ जानेवारी १९२० रोजी प्रसिध्द झाला. आपल्या समाजबांधवांच्या प्रबोधनाबरोबर हिंदू धर्मातील विषमतेवर प्रखर प्रकाश टाकण्याचे कार्य 'मूकनायक' ने केले. डॉ. बाबासाहेब पुढील शिक्षणासाठी लंडनला गेले त्या नंतरही 'मूकनायक' व्यवस्थित चालावे यासाठीचे मार्गदर्शन संपादक ज्ञानदेव ध्रुवनाक घोलप यांना पत्र व्यवहाराने डॉ. बाबासाहेब सातत्याने करीत होते.

एखादी संस्था स्थापन करुन तिच्या मार्फत चळवळीचे कार्य इष्ट ठरेल. अशा विचाराने डॉ. बाबासाहेबांनी 'बहिकृष्त हितकारीणी सभा' नावाची संस्था १९२४ साली स्थापन केली. त्यांनी एक योजना तयार करुन या सभेपुढे मांडली. त्यानुसार एक पत्र काढण्याचे नक्की झाले. त्यानुसार १९ व २० मार्च १९२७ रोजी कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेचे पहिले अधिवेशन महाडला झाले. त्या अधिवेशनाच्या वेळीच महाडच्या सार्वजनिक चवदार तळयावर जाऊन पाणी प्राशन करण्याचा सामुदाईक कार्यक्रम झाला. त्या आंदोलनामुळे वृत्तपत्र काढण्याच्या प्रश्नाला विशेष चालना मिळाली. परिषद झाल्यापासून तेरा दिवसांच्या अवधीतच निधीच्या बळावर 'बहिष्कृत भारत' हे पत्र सुरु करण्यात आले.

बहिष्कृत हितकारिणी सभेतर्फे जिल्हयाजिल्हयातून बहिष्कृत परिषदा भरविणे सुरु झाले. त्यात १० व ११ एप्रिल १९२५ रोजी निपाणी येथे झालेली परिषद अत्यंत महत्त्वपूर्ण अशीच म्हणावी लागेल. आपल्या प्रदीर्घ भाषणात डॉ. बाबासाहेब म्हणतात. "महात्मा गांधी हिंदू-मुसलमान ऐक्य व खादीप्रसाराला जेवढे महत्त्व देतात तेवढे महत्त्व अस्पृश्यता निवारणाला देत नाहीत."

बहिष्कृत समाजात आत्मभान निर्माण केल्याखेरीज तो माणूस म्हणून उभा राहू शकणार नाही. याची जाणिव डॉ. बाबासाहेबांना होती. बहिष्कृतांमध्ये भिनलेल्या लाचारी व मुरलेल्या सहनशीलतेवर प्रखर टीका करताना डॉ. बाबासाहेब म्हणतात, "बहिष्कृतांना हलक्या प्रकारच्या अन्नावर जगावे लागते. पण ते त्याबद्दल तक्रार करीत नाहीत. उलट गावातून तुकडे मागून आणण्यात आपल्यातील किती एक लोक केवढा मोठा अभिमान बाळगतात! पोषाख म्हणावा तर पंचा, घोंगडे आणि जाडेभरडे मुंडासे. पण या दारिद्रयाबद्दल बहिष्कृत लोक नाराजी व्यक्त करीत नाहीत. उलट मेलेल्या मुडद्यावरचे कफनाचे कपडे आणण्यास आमची नेहमी तयारी असतेच. सरकार दरबार, कोर्टकचे-यांत बहिष्कृतांना आत घेत नाहीत. पण आमच्या लोकांनी आपले हक्क गेल्याबद्दल कधी जळफळ केली आहे?

डॉ. बाबासाहेबांनी विषमतावादी व्यवस्थेचे समूळ उच्चाटन करण्याच्या प्रक्रियेतील क्रांतीकारक पाऊल म्हणजे डॉ. बाबासाहेबांनी महिलांचे प्रबोधन केले. २७ डिसेंबर १९२७ ला चवदार तलावास फेरी मारुन लोक बारा वाजता जागेवर परतण्यापूर्वी डॉ. बाबासाहेबांनी महिला भगिनींची सभा घेऊन त्यांना सांगितले की, 'स्वच्छ रहा! पांढरपेश स्त्रियांप्रमाणे पोषाख करा. नवरा व मुले हे दारु पिवून येत असतील तर त्यांना घरात घेऊ नका. मुलांमुलींना शिक्षण द्या. ही आचारसंहिता सांगून डॉ. बाबासाहेबांनी कर्तव्यदक्ष गृहिणीची कुटुंबातील भूमिकाच स्पष्ट केली आहे. असे मला वाटते.

'बहिष्कृत भारत' हे दुसरे वृत्तपत्र यामधील एक प्रसिध्द अग्रलेख 'अस्पृश्योन्नतीचा आर्थिक पाया' या लेखात डॉ. बाबासाहेब म्हणतात.'ज्यांच्या हाताखाली महारांना नोकरी करावयाची असते ते सारे अधिकारी स्पृश्य असतात. हे लोक महारांपासून सरकारी नोकरी करुन घेण्यापुरताच आपल्या अधिकाराचा उपयोग करतात असे नाही, तर ते आपल्या अधिकाराचा उपयोग महार लोक आपल्या पायरीने वागतात की नाही, याविषयी दक्ष राहून त्यांनी पायरी सोडली तर त्यांना शासन करण्यासाठीही अधिकाराचा दुरुपयोग करतात'

'वतन' या शब्दाचा अर्थ वंशपरंपरेचा हुद्दा व वतनी मालमिळकत या दोन गोष्टी प्राप्त होणे अभिप्रेत आहे. परंतु प्रत्यक्षात जमिनीच्या लहान तुकडयाच्या मोबदल्यात भरपूर काम करवून घेणे हाच अर्थउच्चवर्णीयांना अभिप्रेत होता. त्यामुळे वतने खालसा केली पाहिजेत, असे डॉ. बाबासाहेबांचे मत होते. याची कारणे 'बहिष्कृत भारत' मधील अग्रलेखात दिलेली आहेत. १) वतनामुळे महार स्वाभिमानशून्य झाले आहेत. २) वतनामुळे महारांतील महत्त्वकांक्षा साफ मारली गेली आहे. ३) वतन गेल्याशिवाय महारांची सुधारणा होणे शक्य नाही. महार वतन खालसा करावे पण महारांच्या जमिनी काढून घेऊ नयेत त्यावर मामुलजुडी म्हणजे नाममात्र सारा बसविण्यात यावा, असे डॉ. बाबासाहेबांचे मत होते.

मुंबई विधीमंडळात विधेयक मांडताना डॉ. बाबासाहेबांनी असा प्रस्ताव मांडला होता की, वतनदारी जमिनीच्या किंमती ठरविण्यात याव्यात व त्यावर शेतसारा पूर्णपणे घेऊन वतनदार जमिनी रयताव्या म्हणजे त्यांच्या नावे कराव्यात आणि वतनदारांची सरकारी नोकरीच्या खोडयातून सुटका करावी. स्पृश्य सदस्यांच्या विरोधामुळे डॉ. बाबासाहेबांना हे विधेयक मागे घ्यावे लागले. कारण डॉ.बाबासाहेबांनी सुचविलेली वतन ॲक्टची ही सुधारणा हाणून पाडण्याकरिता सरकार, ब्राम्हणेत्तर, ब्राम्हण व मुसलमान यांचे संगनमत होणार हे त्यांना स्पष्टपणे दिसून आले होते. थोडक्यात उपकार करावयास जाताना अपकार होण्याचा प्रसंग येऊ नये म्हणून डॉ. बाबासाहेबांनी माघार घेतली.

'बहिष्कृत भारत' मधील मजकूर हे महाराष्ट्रातील विविध सामाजिक संघटना, संस्था व व्यक्ती यांच्याकडून आलेली पत्रके यावरही आधारीत असायचा. सामाजिक सुधारणेच्या बाजूचे व विरोधातील पत्रकेही ते छापत. त्या पत्रावरील संपादक या नात्याने स्वतःचे मतही व्यक्त करीत असत. सामाजिक सुधारणेच्या विरोधातील पत्रके छापल्यानंतर त्या पत्रकातील वैचारिक भिन्नता असलेल्या मतांचे ते खंडन करीत व सामाजिक सुधारणेच्या बाजूने असलेल्या पत्रकावर ते समर्थनार्थ मत व्यक्त करीत असत. थोडक्यात पत्रकाराची जबाबदारी काय असते याचे पूर्ण भान ठेवून एखादया घटनेच्या समर्थनार्थ व विरोधातील पत्रके व मते छापून त्यांना विचार अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य डॉ. बाबासाहेबांनी दिले असेच म्हणावे लागेल.

प्रबळ असणारी जातीय मानसिकता लक्षात घेऊन ‘बहिष्कृत भारत’ असे आपल्या पत्राचे नाव असल्यामुळे अस्पृश्यांशिवाय दुसरे कोणीही वाचत नाहीत. म्हणून पत्राचे नाव बदलून ‘जनता’ असे केले. ‘जनता’ पत्राच्या वाचकांसाठी डॉ. बाबासाहेबांनी विलायतेस जात असताना व विलायतेहून सविस्तर पत्र पाठवून मार्गदर्शन केले आहे. काही प्रवास वर्णनांचा भाग या पत्रात असला तरी डॉ. बाबासाहेबांनी स्वतःच्या शैलीत गोलमेज परिषदांचा सविस्तर वृत्तांत या पत्रात आपणस वाचण्यास मिळतो. त्याचबरोबरडॉ. बाबासाहेब – गांधी यांचा वैचारिक संघर्षाचे स्वरुप देखील ‘जनता’ या पत्रातून तपासता येईल.

‘मूकनायक’ आणि ‘बहिष्कृत भारत’ ही दोन्ही पाक्षिके बंद पडल्यानंतर डॉ. बाबासाहेबांनी समता संघाची स्थापना केली. त्यांनी या संस्थेमार्फत ‘समता’ या पाक्षिकाचे प्रकाशन केले. कालांतराने ‘जनता’ या पाक्षिकाचे ‘प्रबुध्द भारत’ असे दिनांक ४ फेब्रुवारी १९५६ रोजी नामांतर करुन डॉ. बाबासाहेबांनी ‘प्रबुध्द भारत’ चे अंक प्रकाशित केले. अखिल मानव जातीला विकासाचा मंत्र देणा–या भगवान गौतम बुध्दांची कमळावर विराजमान असलेली प्रतिमा ‘प्रबुध्द भारत’ च्या मुखपृष्ठावर होती. बौध्द धम्म स्विकारासंबंधीचे लेख, बुध्द जीवनावरील कथा, बुध्द तत्त्वज्ञानाची चर्चा यातून मोठया प्रमाणत झाल्याचे दिसून येते.

‘प्रबुध्द भारत’ महामानवाच्या जयंतीचे विशेष अंक काढले. डॉ. आंबेडकर जयंती विशेषांक, बुध्द जयंती विशेषांक, राजर्षी शाहू जयंती विशेषांक त्याचप्रमाणे नुकतेच स्वातंत्र्य मिळाले होते. ‘भारत’ देश जगाच्या नकाशावर उदयास आला. गोवा राज्य आणि हैद्राबादचे संस्थान, सीमा प्रश्न त्याचबरोबर कळीचा प्रश्न म्हणजे संयुक्त महाराष्ट्राची चळवळ अनेकांनी बलिदान दिले. शाहिर अमर शेख, शाहिर गवाणकर यांनी मोठया प्रमाणात जनजागृती केली.त्याचवेळी ‘प्रबुध्द भारत’ च्या अंकांनी आपली भूमिका चोखपणे बजावली. डॉ. बाबासाहेबांची राज्यसभेची निवड या सारख्या तत्कालीन राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि शैक्षणिक घडामोडीचे लेखन हा ‘प्रबुध्द भारत’ चा अविभाज्य भाग होता.

डॉ. बाबासाहेबांच्या धर्मांतराच्या घोषणेने देशभरात प्रचंड खळबळ माजली. समाजसुधारक, विचारवंत आणि राजकीय आंदोलने करणा–यांनी डॉ. बाबासाहेबांच्या भूमिकेला प्रचंड विरोध केला. थोडया लोकांनी या भूमिकेचे समर्थन केले. गांधीजीचे मत असे होते की, ‘अस्पृश्यता मरणोन्मुख अवस्थेत आली आहे. अस्पृश्यांना धर्मांतर करण्याची जरुरी नाही’ आज एकविसाव्या शतकामध्येही अस्पृश्यता पूर्णपणे संपलेली नाही. याचा अर्थ गांधीचे विधान हास्यास्पद स्वरुपाचे आहे असेच म्हणावे लागेल. याचप्रमाणे न.चिं.केळकर, ल.ब.भोपटकर, सिध्देश्वरशास्त्री चित्राव, श्री.म.माटे यांचाही समावेश होता. या सर्वांनी एकत्रितपणे पत्र पाठवून डॉ. बाबासाहेबांच्या धर्मांतराच्या घोषणेने वाईट वाटल्याचे लिहिले.

तसेच अनुकूल मत व्यक्त करणारांमध्ये डॉ. हरिसिंह गौर हे प्रमुख होते. त्यांनी डॉ.बाबासाहेबांना बौध्द धर्माचा विचार करण्याचा सल्ला दिला. त्याचबरोबर लोकमान्य, ज्ञानप्रकाश, विहार, सेवक, राष्ट्रवीर, दीनमित्र, विविधवृत्त या वृत्तपत्रांनी अनुकूल मते मांडली.

‘प्रबुध्द भारत’ ने धम्मचक्र प्रवर्तनासाठी भक्कम वातावरण निर्मिती केली. त्याचप्रमाणे महापुरुषांच्या जयंतीचे औचित्य साधून काढलेले ‘प्रबुध्द भारत’ चे अंक म्हणजे सामाजिक सलोख्याचा वस्तुपाठच या अंकानी घालून दिला असेच म्हणावे लागेल. थोडक्यात सामाजिक स्पंदनांना शब्दबध्द करण्याचे काम ‘प्रबुध्द भारत’ ने केले.

डॉ. बाबासाहेब जसे घटनाकार, जलतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ म्हणून परिचित आहेत. तसेच ते कणखर पत्रकारही होते. डॉ. बाबासाहेबांच्या अष्टपैलू व्यक्तीमत्त्वा पैकी पत्रकार हा पैलू देखील अविस्मरणीय ठरला. मूकनायक, जनता, समता व प्रबुध्द भारत यामधून त्यांना बुलंद पत्रकारीता केली.

डॉ. बाबासाहेबांनी पत्रकारीतेत धर्मसंस्था, धर्मविचार आणि जातीची उत्तरं याचा मागोवा घेतला. हिंदू समाजव्यवस्था आणि अस्पृश्यांच्या इतिहासाची त्यांनी सद्सद्विवेक जागृत ठेवून चिकित्सा केली. महाडचा सत्याग्रह, पर्वती सत्याग्रह, महार वतने, गिरणी मालक व कामगार यांचे प्रश्न, खोतीचे प्रश्न, गुलामगिरी, महिला या सारख्या असंख्य प्रश्नाना वाचा फोडून त्या समस्याचे निवारण करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेबांनी आपल्या पत्रकारीते आधारे केले.

### *संदर्भ ग्रंथ :–*

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (संक्षिप्त चरित्र) सुनिता गायकवाड, सुविधा प्रकाशन.
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समजून घेताना– प्रा. जी.एस.भोसले, ज्योती प्रकाशन.
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे (जातीव्यवस्थेचे निर्मूलन) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्रसाधने प्रकाशन समिती उच्च व तंत्रशिक्षण विभाग, म. रा.
४) समग्र बाबासाहेब – संपादक – बाळासाहेब मागाडे– थिंकटॅंक पब्लिकेशन.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org